**L. C. BILL No. III OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA *MATHADI*, *HAMAL* AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1969.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३.**

**महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक २० मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६९ चा महा. ३०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० मधील, " श्रमजीवी कामगार " या मजकुराऐवजी, " अंगमेहनतीचे काम करणारे कामगार " हा मजकूर दाखल करणे.

१९६९ चा महा. ३०.

**२.** महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याचे दीर्घ शीर्ष, प्रस्तावना व संक्षिप्त नाव यांसह या संपूर्ण अधिनियमामध्ये, " श्रमजीवी कामगार " हा मजकूर, ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी, " अंगमेहनतीचे काम करणारे कामगार " हा मजकूर, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात येईल.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(१) खंड (२) मधील, " कोणतेही काम " या मजकुराऐवजी, " कोणतेही अंगमेहनतीचे काम " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (३) मधील, " कामावर ठेवलेल्या " या मजकुराआधी, " कोणतेही अंगमेहनतीचे काम करण्यासाठी " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(३) खंड (६) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (६अ) " अंगमेहनतीचे काम " म्हणजे, कोणत्याही प्रकारच्या यंत्रांच्या कोणत्याही मदतीशिवाय किंवा आधाराशिवाय किंवा सहाय्याशिवाय मानवाने केलेले कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रमाचे काम, आणि त्यामध्ये, अनुसूचित नोकऱ्यांमधील माल चढविण्याचे, उतरविण्याचे, रचण्याचे, त्याची ने-आण करण्याचे, त्याचे वजन व मापन करण्याचे अंगमेहनतीचे काम यांचा समावेश होतो ; " ;

(४) खंड (७) मधील, " असंरक्षित कामगारांना " या मजकुराआधी, " कोणतेही अंगमेहनतीचे काम करण्यासाठी " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(५) खंड (११) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (११) " असंरक्षित कामगार " म्हणजे, ज्याला कोणत्याही अनुसूचित नोकरीतील अंगमेहनतीचे काम करण्यासाठी कामावर ठेवले असेल, किंवा कामावर ठेवावयाचे असेल ; आणि असा अठरा वर्षे व त्यावरील वयाचा, आणि पासष्ट वर्षांपर्यंत वय असलेला,— आणि त्यानंतर, जर शासनाने प्राधिकृत केलेल्या वैद्यक व्यवसायीने असे काम करण्यासाठी तो शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणित केले असेल तर, त्या वयाचा माथाडी, हमाल किंवा इतर अंगमेहनतीचे काम करणारा कामगार, परंतु, त्यात,—

(अ) कोणत्याही आस्थापनेचे, उद्योगाचे किंवा कारखान्याचे वस्तूनिर्मिती प्रक्रिया क्षेत्र किंवा संचय व साठवणूक क्षेत्र येथे, अथवा जेथे कोणत्याही आस्थापनेमधील, उद्योगामधील, किंवा कारखान्यामधील यांत्रिक प्रक्रियेमार्फत किंवा यंत्रामार्फत किंवा स्वयं-चलित प्रक्रियेमार्फत प्रक्रिया केली जात असेल तेथे, मालकाने किंवा मूळ मालकाने कामावर ठेवलेल्या कोणत्याही कामगाराचा (अंगमेहनतीचे काम करण्यासाठी ज्याला कामावर ठेवले असेल किंवा कामावर ठेवावयाचे असेल त्याखेरीज) ;

(ब) मालकाच्या कुटुंबातील सदस्याचा,

समावेश होणार नाही ; " ;

(६) खंड (१२) मधील, " श्रमाचे काम " या मजकुराऐवजी, " अंगमेहनतीचे काम " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क) असंरक्षित कामगारांची भरती करणे व त्यांना योजनेत प्रवेश देणे, आणि असंरक्षित कामगारांची नोंदणी पुस्तके व प्रतीक्षा यादी ठेवणे, नोंदणी पुस्तकांतील व प्रतीक्षा यादीतील त्यांची नावे, एकतर तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे, आणि नोंदणीसाठी फी लादणे यांसह असंरक्षित कामगारांची व मालकांची नोंदणी करणे व नोंदणी रद्द करणे यांचे नियमन करणे ; ".

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मधील, पोट-कलम (१) मध्ये, दुसऱ्या परंतुकामधील, खंड (ब) मध्ये, " कामगार " हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी, " असंरक्षित कामगार " हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, " कामगाराकडून " या मजकुराऐवजी, " असंरक्षित कामगाराकडून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (३) मध्ये, " कर्मचाऱ्यास " या मजकुराऐवजी, " असंरक्षित कामगार " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) समास टिपेमधील, " कामगार " या मजकुराऐवजी, " असंरक्षित कामगार " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (१अ) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणत्याही कारणास्तव सल्लागार समिती कार्यरत नसेल तर, राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, सल्लागार समितीच्या सल्ल्याशिवाय किंवा तिच्याशी विचारविनिमय केल्याशिवाय, अधिसूचना काढता येईल किंवा निर्णय घेता येईल.";

(२) पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (६) (अ) राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त, सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी, त्यांच्या नावांची अधिसूचना, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल. असे सदस्य, शासनाची मर्जी असेपर्यंत, पद धारण करतील.

(ब) राज्य शासन, राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांची रिक्त पदे, लवकरात लवकर व कोणत्याही परिस्थितीत, असे पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होण्यापूर्वी भरील.".

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम १४ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, स्पष्टीकरणामधील, " चौदा " या मजकुराऐवजी, " अठरा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम १६ ची सुधारणा.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यातील विवक्षित नोकऱ्यांमध्ये कामावर ठेवलेल्या असंरक्षित श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करण्यासाठी, अशा नोकऱ्यांमध्ये त्यांचा पुरेसा पुरवठा व्हावा आणि त्यांचा यथोचित व पूर्णपणे उपयोग व्हावा यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित असलेल्या बाबींसाठी तरतूद करण्याकरिता, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ (१९६९ चा महा. ३०) अधिनियमित केला आहे.

२. उक्त अधिनियमाची, राज्यामध्ये, अनेक वर्षांपासून अंमलबजावणी केली जात आहे. उक्त अधिनियमाची अंमलबजावणी करताना, मालकांच्या संघटना व तसेच श्रमिक संघ यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आहेत. म्हणून, असंरक्षित कामगारांचे नियमन व त्यांचे कल्याण यासाठी उक्त अधिनियमाखालील कार्यपद्धती सुलभ करण्याच्या आणि उक्त अधिनियमाची व त्याखाली केलेल्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमात विवक्षित सुधारणा करणे आवश्यक आहे असे शासनास वाटते.

३. उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (११) मध्ये, " असंरक्षित कामगार " या संज्ञेची व्याख्या, ज्याला, कोणत्याही अनुसूचित नोकरीतील श्रमजीवी कामगार, म्हणून कामावर ठेवलेले आहे किंवा कामावर ठेवावयाचे आहे, असा कामगार अशी केली आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये, " कामगार " या संज्ञेची व्याख्या, कोणत्याही अनुसूचित नोकरीतील श्रमाचे काम करण्यासाठी, प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही अभिकरणामार्फत, कामावर ठेवलेली किंवा कामावर ठेवण्यात येणारी व्यक्ती,— मग तिला वेतनावर ठेवण्यात आलेले असो वा नसो,– अशी केली आहे. तथापि, उक्त अधिनियमामध्ये " अंगमेहनतीचे काम " या संज्ञेची व्याख्या केलेली नसल्यामुळे, अनुसूचित नोकरीतील कामाच्या प्रकारांसाठी उक्त अधिनियम लागू करण्यामध्ये संदिग्धता निर्माण झाली आहे. म्हणून, या अधिनियमात, " अंगमेहनतीचे काम " या संज्ञेची व्याख्या जादा दाखल करणे आणि " असंरक्षित कामगार " या संज्ञेच्या व्याख्येऐवजी नवीन व्याख्या दाखल करणे देखील आवश्यक आहे, असे शासनास वाटते.

४. उक्त अधिनियमाच्या कलम १४ मध्ये अशी तरतूद केली आहे की, राज्य शासनास, उक्त अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीमधून उद्‌भवणाऱ्या, राज्य शासनाकडून सल्ल्यासाठी तिच्याकडे पाठविण्यात येतील अशा बाबींवर सल्ला देण्यासाठी सल्लागार समितीची स्थापना करता येईल. सल्लागार समितीमध्ये, मालक, कामगार, राज्य विधानमंडळाचे सदस्य व राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य यांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्यांचा पदावधी, सामान्यपणे तीन वर्षे इतका आहे. सल्लागार समितीचे कामकाज सुलभपणे चालण्याच्या दृष्टीने, राज्य शासन, राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांच्या रिक्त जागा, लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत, अशा जागा रिक्त झाल्याच्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होण्यापूर्वी भरील अशी तरतूद करण्यासाठी उक्त कलमात सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

जर कोणत्याही कारणास्तव काही कालावधीसाठी सल्लागार समिती कार्यरत नसेल तर, राज्य शासनास, सल्लागार समितीच्या सल्ल्याअभावी, उक्त अधिनियमाच्या विविध तरतुदींची अंमलबजावणी करता येऊ शकत नाही अथवा योजना करता येऊ शकत नाही किंवा त्यांमध्ये फेरबदल करता येऊ शकत नाही. म्हणून शासनाला, समिती कार्यरत होईपर्यंत, अधिसूचना काढता येतील किंवा त्या अन्वये निर्णय घेता येतील अशी तरतूद करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाच्या कलम १४ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनास वाटते.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १४ मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

५. उक्त अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, कोणत्याही मुलास, म्हणजेच, ज्या व्यक्तीचे वय चौदा वर्षे पूर्ण झाले नसेल अशा व्यक्तीस, कोणत्याही अनुसूचित नोकरीत काम करण्यास मनाई करण्याची तरतूद केली आहे. बाल व किशोरवयीन मुले कामगार (प्रतिबंध व विनियमन) अधिनियम, १९८६ (१९८६ चा ६१)

यामध्ये किशोरवयीन मुलांना, म्हणजेच, ज्या व्यक्तीचे वय चौदा वर्षे पूर्ण झालेले आहे, परंतु, तिचे अठरा वर्षे वय पूर्ण झालेले नाही अशा व्यक्तीला, जोखीमकारक व्यवसायांमध्ये काम करण्यास मनाई केली आहे. विविध कामगार कायद्यांमध्ये, बालकामगारांची वयोमर्यादा अठरा वर्षांपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्याच धर्तीवर, कोणत्याही अनुसूचित नोकरीत, अठरा वर्षे वयाखालील बालकांच्या रोजगारास मनाई करण्याच्या दृष्टीने, बालकांची उक्त वयोमर्यादा, चौदा वर्षांवरून अठरा वर्षांपर्यंत वाढविणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

६. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १८ मार्च २०२५.

**आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.

**सन २०२५ चे वि. प. वि. क्रमांक ३.— महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.**

**[महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यातील उतारे]**

**(सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०)**

**महाराष्ट्र राज्यातील विवक्षित नोकऱ्यांमध्ये कामावर ठेललेल्या, असंरक्षित श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करण्यासाठी व अशा नोकऱ्यांमध्ये त्यांचा पुरेसा पुरवठा व्हावा व त्यांचा यथोचित व पूर्णपणे उपयोग व्हावा यासाठी त्यांच्याशी संबंधित असलेल्या बाबींसाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, विवक्षित नोकऱ्यांमध्ये कामावर ठेवलेल्या माथाडी, हमाल इत्यादींसारख्या असंरक्षित क्षमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करणे, त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती यांसाठी अधिक चांगली तरतूद करणे व अशा नोकऱ्यांमध्ये ज्या ठिकाणी त्यांचे कल्याण, आरोग्य व इतर सुरक्षिततेचे उपाय योजणे आवश्यक असेल तेथे त्यांच्या कल्याणासाठी आणि आरोग्यासाठी व इतर सुरक्षिततेच्या उपायांसाठी तरतूद करणे ; टाळता येण्याजोग्या बेकारीस प्रतिबंध करण्यासाठी अशा नोकऱ्यांमध्ये, अशा कामगारांचा पुरेसा पुरवठा होईल व त्यांचा पूर्णपणे व यथोचित उपयोग केला जाईल हे निश्चित करण्यासाठी तरतूद करणे; या व अशाच प्रकारच्या प्रयोजनांसाठी, अशा नोकऱ्यांच्या संबंधात व राज्याच्या निरनिराळ्या क्षेत्रात (आवश्यक असेल तेथे) मंडळे स्थापन करण्याची तरतूद करणे; आणि उपरोक्त बाबींशी संबंधित प्रयोजनासाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ असे म्हणावे.

(२) ते (४) * * * *

(४अ) * * * *

व्याख्या.

**२.** (१) * * * *

(२) एखाद्या असंरक्षित कामगाराच्या संबंधात ' ठेकेदार ' याचा अर्थ, मजुरीवर किवा अन्यथा, जी असे कामगार कामावर ठेवून, एखाद्या आस्थापनेचे कोणतेही काम पार पाडण्याची हमी घेईल किंवा जी असे कामगार, गटागटाने, टोळीने किंवा एकएकटे याप्रमाणे पुरवील अशी व्यक्ती असा आहे; आणि त्यात, 'पोट ठेकेदार', ' अभिकर्ता (एजंट) ', ' मुकादम ' किंवा ' टोळीवाला ' यांचाही समावेश होतो.

(३) ठेकेदारामार्फत किंवा त्याने कामावर ठेवलेल्या कोणत्याही असंरक्षित कामगाराच्या संबंधात 'मालक' याचा अर्थ, मूळ मालक व इतर कोणत्याही असंरक्षित कामगाराच्या संबंधात, आस्थापनेच्या कामकाजाचे अंतिम नियंत्रण जिच्या हाती असेल ती व्यक्ती असा आहे, आणि त्यात, त्या आस्थापनेचे कामकाज जिच्याकडे सोपविले असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीचा, मग अशा व्यक्तीस, अभिकर्ता (एजंट), म्हणून, व्यवस्थापक म्हणून किंवा अनुसूचित नोकरीत प्रचलित असलेल्या इतर कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो, समावेश होतोः

(४) ते (६) * * * *

(७) ' मुळ मालक ' याचा अर्थ, कोणत्याही अनुसूचित नोकरीमध्ये, जो असंरक्षित कामगारांना ठेकेदारामार्फत किंवा त्याच्यावतीने कामावर लावतो तो मालक असा आहे;

(८) ते (१०) * * * *

(११) ' असंरक्षित कामगार ' याचा अर्थ, ज्याला कोणत्याही अनुसूचित नोकरीतील कामावर ठेवले असेल किंवा कामावर ठेवावयाचे असेल, असा श्रमजीवी कामगार असा आहे;

(१२) ‘कामगार’ याचा अर्थ, कोणत्याही अनुसूचित नोकरीतील श्रमाचे काम करण्यासाठी, थेट किंवा कोणत्याही अभिकरणामार्फत (एजन्सी), कामावर ठेवलेली किंवा कामावर ठेवण्यात येणारी व्यक्ती असा आहे - मग तिला वेतनावर ठेवण्यात आलेले असो किंवा नसो - आणि त्यात, मालकाने किंवा ठेकेदाराने कामावर न ठेवलेल्या परंतु त्या मालकाच्या किंवा ठेकेदाराच्या परवानगीने, किंवा मालकाशी किंवा ठेकेदाराशी केलेल्या करारान्वये, काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो; परंतु त्यात, मालकाच्या कुटुंबियांचा समावेश होणार नाही ;

(१३) * * * *

असंरक्षित कामगारांना नियमित नोकरी मिळावी हे निश्चित करण्यासाठी योजना.

**३.** (१) * * * *

(२) विशेषकरून या योजनेमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल—

(अ) व (ब) * * * *

(क) असंरक्षित कामगारांची भरती व त्यांना योजनेत दाखल करून घेणे या गोष्टींचे नियमन करणे आणि नोंदणीपुस्तकं ठेवणे, नोंदणीपुस्तकातील नावे तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे व नोंदणीसाठी लादावयाची फी यासह असंरक्षित कामगार व मालक यांची नोंदणी करणे;

(ड) ते (ल) * * * *

(३) * * * *

योजना तयार करणे, योजनेमध्ये बदल करणे किंवा ती मागे घेणे.

**४.** (१) राज्य शासनास, सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रसिद्धींच्या शर्तीना अधीन राहून अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या एका किंवा त्याहून अधिक क्षेत्रात, कोणत्याही अनुसूचित नोकरीसाठी किंवा अनुसूचित नोकऱ्यांच्या गटांसाठी, एक किंवा त्याहून अधिक योजना तयार करता येतील आणि त्याने केलेल्या कोणत्याही योजनेत तशाच रीतीने भर घालता येईल, तीत सुधारणा करता येईल, बदल करता येईल किंवा त्याऐवजी दुसरी योजना तयार करता येईल :

परंतु अशी कोणतीही अधिसूचना **राजपत्रात** तो प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचा कालावधी समाप्त झाल्याखेरीज, अंमलात येणार नाही :

परंतु आणखी असे की, राज्य शासनास—

(अ) त्यास आवश्यक वाटेल तर, किंवा

(ब) कोणत्याही अनुसूचित नोकरीसाठी किंवा तिच्या भागासाठी अशा रीतीने तयार केलेल्या कोणत्याही योजनेच्या तरतुदी अशा अनुसूचित नोकरीतील मालकाशी व कामगारांशी विचारविनिमय केल्यानंतर, अशा दुसऱ्या अनुसूचित नोकरीस लागू कराव्यात अशी कोणत्याही दुसऱ्या अनुसूचित नोकरीतील बहुसंख्य मालकांनी किंवा कामगारांनी मागणी केली असेल किंवा विनंती केली असेल तर, अशा योजनेच्या तरतुदी किंवा तिचा भाग राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरबदलांसह असे कोणतेही फेरबदल असल्यास, अशा अनुसूचित नोकरीस लागू करता येतील.

(२) * * * *

**५.** ते **१२.** * * * *

मालक व कामगार यांजकडून येणे असलेल्या रकमा निश्चित करणे.

**१३.** (१) मंडळात किंवा त्याने याबाबतीत विनिर्दिष्ट केले असेल अशा अधिकाऱ्यास या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही योजनेअन्वये कोणत्याही मालकाकडून किंवा कामगाराकडून येणे असलेल्या कोणत्याही रकमेचे निश्चितीकरण आदेशाद्वारे करता येईल आणि या प्रयोजनासाठी मंडळास किंवा अशा अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी असलेल्या करता येईल.

(२) * * * *

(३) मालकास किंवा, यथास्थिति, कामगारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज कोणत्याही मालकाकडून किंवा कामगाराकडून येणे असलेली रक्कम निश्चित करणारा कोणताही आदेश पोट-कलम (१) अन्वये काढला जाणार नाही.

(४) व (५) * * * *

**१४.** (१) ते (५) * * * * सल्लागार समिती.

(६) सल्लागार समितीच्या सदस्यांना पदावधी, विहित करण्यात येईल, त्याचप्रमाणे असेल.

(७) * * * *

**१५.** * * * *

**१६.** कोणत्याही मुलास अनुसूचित नोकरीत काम करण्यास भाग पाडता येणार नाही किंवा त्यास तशी परवानगी देण्यात येणार नाही. मुलांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिषेद.

**स्पष्टीकरण.—** ' मूल ' याचा अर्थ, ज्या व्यक्तीच्या वयाची चौदा वर्ष पूर्ण झाली नसतील अशी व्यक्ती असा आहे.

**१७.** व **२८.** * * * *

**अनुसूची.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

[**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.**]

[**महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**]

[**श्री. आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.]

[**विधानपरिषदेने दिनांक २० मार्च, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.**]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई